RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ८, अंक ७] मंगळवार, फेब्रुवारी १५, २०२२/माघ २६, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक १५

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२

अधिसूचना

राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९ (पुनः सुधारित २०२२).

(१) पक्षाच्या नावात बदल करण्याबाबतचे निकष.

(२) पक्षाच्या मुख्य कार्यालयाच्या पत्त्यात व कार्यकारणीमध्ये बदल केल्यावर सादर करावयाचे दस्तऐवज.

राजकीय पक्षाची नोंदणी आदेश, २००९ (पुनःसुधारित २०२२) क्र. रानिआ/रापनों-२०२२/प्र.क्र.२०/का.११.—ज्याअर्थी, संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित कायद्यातील तरतुदींन्वये सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याबाबतचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास प्राप्त आहेत.

२. आणि ज्याअर्थी, राजकीय पक्षांच्या आधारावर लढविल्या जाणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये (महानगरपालिका, नगरपरिषदा / नगरपंचायती, जिल्हापरिषदा व पंचायत समित्या) राजकीय पक्षांना त्यांची महत्त्वाची भूमिका अदा करणे शक्य व्हावे यासाठी राज्य निवडणूक आयोगाने नोंदणी, चिन्ह वाटप इत्यादी बाबींसाठी खालीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत :—

(*i*) राजकीय पक्षाची नोंदणी आदेश, २००४ (यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आली असून सध्या दि. ३१ मार्च, २००९ हा आदेश अस्तित्वात आहे.) व

(*ii*) महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९

(*iii*) राजकीय पक्षांची नोंदणी आदेश,२००९ (सुधारित २०१८) दि. २५ जुलै २०१८.

३. आणि ज्याअर्थी, विविध राजकीय पक्षांकडून प्राप्त होणारी निवेदने व अहवाल यांचे अवलोकन केल्यावर उक्त आदेशातील भाग दोन ३. (१०) (अ) मध्ये राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्यात आल्यानंतर त्या पक्षाच्या नावामध्ये, मुख्य कार्यालयाच्या पत्त्यामध्ये करण्यात येणाऱ्या बदलांबाबत एकसमान कार्यपद्धती राबविण्याच्या दृष्टीने निकष निश्चित करणे गरजेचे आहे,असे आयोगाचे मत झाले आहे,

४. आणि ज्याअर्थी, असे निकष निश्चित केल्यामुळे राजकीय पक्षांच्या कामकाजात अधिक पारदर्शकपणा येईल अशी आयोगाची धारणा आहे,

५. त्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग, राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९ मधील भाग दोन ३. (१०) (अ) मध्ये सुधारणा करून खालीलप्रमाणे कार्यपद्धती निश्चित करण्यात येत असल्याबाबतचे आदेश निर्गमित करीत आहे :—

आदेश

(*i*) राजकीय पक्षाने नाव बदलाबाबत आयोगाकडे प्रस्ताव सादर करताना त्यासोबत पक्ष कार्यकारणीच्या बैठकीत सदर नाव बदलण्याबाबत मंजूर झालेल्या ठरावाची नोटरीद्वारे प्रमाणित केलेली प्रत जोडणे आवश्यक राहील.

(*ii*) परंतु,असे नाव आयोगाकडून नोंदणी केलेल्या तसेच नोंदणी रद्द झालेल्या पक्षांच्या नावाशी साधर्म्य असलेले असू नये.

(*iii*) पक्षाकडून असा प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्याच्या नावातील बदलाबाबत सर्वसाधारण जनतेकडून ३० दिवसांच्या मुदतीत हरकती मागविण्याबाबत अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईल. या कालावधीत हरकती प्राप्त झाल्यास त्याची शहानिशा करून राज्य निवडणूक आयोग पक्षाच्या नाव बदलास परवानगी देण्याबाबत निर्णय घेईल.

(*iv*) राजकीय पक्षांना त्यांच्या नोंदणीनंतर असे नाव बदलण्याबाबत आयोगाकडून परवानगी फक्त एकदाच देण्यात येईल.

(*v*) राजकीय पक्षांनी त्यांच्या मुख्य कार्यालयाच्या पत्त्यात बदल केल्यास त्याबाबत आयोगास सूचित करताना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून (उदा. ग्रामपंचायत / नगरपरिषद / नगरपंचायत / महानगरपालिका) मुख्य कार्यालयाच्या बदललेल्या पत्त्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र आयोगास सादर करणे अनिवार्य असेल.

(*vi*) राजकीय पक्षांनी त्यांच्या कार्यकारणीत पदाधिकाऱ्याचे निधन, राजीनामा, निवडणूक इ. कारणांमुळे वेळोवेळी करण्यात आलेल्या बदलाबाबत त्या पक्षाच्या अधिकृत वेबसाइटवर प्रसिध्दी देण्याबरोबरच याबाबत आयोगास विनाविलंब कळविणे आवश्यक असेल. आयोगास असा अहवाल सादर करताना पक्षाच्या सर्वसाधारण सभेमध्ये पारित झालेल्या संबंधित ठरावाची (सर्व उपस्थित सदस्यांच्या स्वाक्षरींची) नोटरीद्वारे प्रमाणित केलेली प्रत जोडणे अनिवार्य असेल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

किरण कुरुंदकर,

सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA
New Administrative Building,Opposite Mantralaya,
Madame Cama Road, Mumbai 400 032, Dated 15th February, 2022.

NOTIFICATION

POLITICAL PARTIES REGISTRATION ORDER, 2009 (RE-REVISED 2022).

(1) Criteria for the change in the name of a Political Party.

(2) Documents to be submitted after making change in-address and working committee of a Party.

The Registration of Political Parties Order, 2009 (Re-revised 2022) No.SEC/RPP2022/CR.20/D-11.—Whereas, as per the Articles 243K and 243ZA of the Constitution and also under the provisions of the relevant laws on local bodies in the state, the powers of superintendence, direction and conduct of all elections to the local bodies vest in the State Election Commission,

2. And whereas, in order to enable political parties to play their vital role in the party-based elections to the local bodies (Municipalities, Municipal Councils / Nagar Panchayats, Zilla Parishads and Panchayat Samiti), the State Election Commission has passed the following orders in the past for registration, distribution of symbols, etc.:—

(*i*) The Registration of Political Party Order, 2004 (This has been amended from time to time and currently, Order dated 31st March, 2009 is in force.)

(*ii*) Maharashtra Election Symbols (Reservation and Distribution) Order, 2009

(*iii*) Registration of Political Parties Order, 2009 (Revised 2018) dated July 25, 2018.

3. And whereas, after reviewing reports and applications received from various political parties, this Commission has arrived at the opinion about necessity to amend PART II 3. (10) (a) of the said order, so as to fix certain criteria for making changes in respect of its name , head office address and working committee,

4. And whereas, the Commission is of the view that setting such criteria will lead to greater transparency in the functioning of political parties.

5. Now therefore, State Election Commission, hereby issues the following Order with respect to the amendment in the Part Two 3. (10) (a) of the Registration of Political Parties Order, 2009

Order

(*i*) Any political party desirous of changing its name shall submit a proposal to the Commission. It will be necessary to attach a notarised copy of the resolution approved in the meeting of the Party Working Committee.

(*ii*) Such name shall not closely resemble with the name of any other political party either earlier registered or de-registered by this Commission.

(*iii*) Upon receipt of such a proposal from the party, a notification will be published in the *official Gazette* seeking objections from the general public within 30 days. If any objection is received during this period, the State Election Commission will take a decision on whether to allow the change in the name of that party.

(*iv*) After its registration, a political party will be allowed to change its name only once.

(*v*) In case of change in the address of head office of a political party, it will be mandatory for the Parties to furnish, No-Objection Certificate from the concerned local body (e.g. Village Panchayat / Nagar Parishad / Nagar Panchayat / Municipal Corporation) regarding the changed address of its head office, to this Commission.

(*vi*) In case of change in the Party's Working Committee on account of death, resignation etc. of office bearer/s , or on account of routine election , or due to any other reason, it will be mandatory for the party to publish such changes on Party's official website besides promptly informing this to the Commission. It is mandatory for that party to submit such report along with a copy of the resolution passed in its general body meeting (with signatures of every member present) duly attested by a Notary.

By order of the State Election Commissioner,

KIRAN KURUNDKAR,

Secretary,
State Election Commission, Maharashtra.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.